# अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त कार्यक्रम



**पुणे :** पंख संस्था, क्विकहिल फाऊंडेशन आणि खडक पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शिवाजी मराठा कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये पोलिस निरीक्षक उत्तम चक्रे यांनी विद्यार्थ्यांना वयात येतानाचे धोके आणि व्यसने या विषयावर मार्गदर्शन केले.

पंख संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे यांनीही मुलांना या विषयावर मार्गदर्शन केले. याचबरोबर व्यसनाधीनता, त्याचे प्रकार व त्यातील धोके यावर पंख संस्थेचे समुपदेशक कौस्तुभ जोगळेकर यांनी मुलांना माहिती दिली.

मुलांकडून व्यसनांपासून दूर राहण्यासाठीची प्रतिज्ञा म्हणण्यात आली.

या कार्यक्रमासाठी क्विकहिल फाऊंडेशनचे सी.एस.आर प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था अध्यक्ष स्मिता आपटे, शाळेच्या मुख्याध्यापिका कांबळे, उपमुख्याध्यापिका वांद्रे, कड इतर पोलिस कर्मचारी व शिक्षक उपस्थित होते. कड यांनी आभार मानले.

## नोवोटेल इमेजिकामध्ये लुटा पावसाची मजा

**पुणे :** पावसाचा आनंद घेण्यासाठी नोवोटेल इमेजिका खोपोलीत सर्वांत चांगले ठिकाण आहे. संपूर्ण मान्सून वीकेंड येथे एन्जॉय करू शकता. सह्याद्रि पर्वतांवर ट्रेकिंग करताना आणि नंतर आपल्या क्रियाकलाप आणि ॲनिमेशन विभागात आपले मन आनंद घेत असताना क्युरेटेड ट्रॅव्हल प्रोग्राम आपल्याला विशेषत: एड्रेनेलीनच्या